# MT

Seat No.

2018 .... .... 1100

**MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - SEMI PRELIM - I - PAPER - III**

**Time : 3 Hours** **(Pages 12)** **Max. Marks : 100**

---

### विभाग १ – गद्य

**प्र.१ अ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) आकृतिबंध पूर्ण करा.** **2**

(i)




(ii)




त्यानंतर माझ्या आयुष्यातला एक निराळेच वळण लागले. माझे चुलते पुण्याच्या वाय. एम. सी. ए. च्या कंपाऊंडमध्ये राहत असत. ही संस्था खेळाकरिता प्रसिद्ध असल्याकारणाने बरेच लोक या संस्थेचे सभासद होते. रोज सकाळ-संध्याकाळ ज्यांना जसे जमेल त्याप्रमाणे ते खेळायला येत असत. साहजिकच याचा परिणाम माझ्या बालमनावर होई. मुळातच खेळाची आवड जास्त असल्याने मी त्या सभासदांचा खेळ लक्ष देऊन पाहू लागलो. अनेक खेळाडू पाहण्याची मला रोज संधी मिळू लागली. शाळा सुटली ना सुटली तोच धावत येऊन मी प्रथम ग्राऊंडवर हजर होत असे. सर्व खेळांत मला क्रिकेटचा खेळ फार आवडू लागला. या खेळानेच मला जास्त भुरळ पाडली. कधी कधी, काही खेळाडू स्वत:ला भरपूर खेळायला मिळावे म्हणून लवकर येत असत. कोणी नाही असे पाहून ते मला चेंडू फेकायला बोलवत. मी अशा कामासाठी नेहमीच तयार असायचा. आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन! या संधीचा पुरेपूर फायदा घेऊन मी अधिक उत्साहाने आणि आनंदाने जितक्या जोरात बॉल टाकता येईल, तितक्या जोरात तो टाकून सभासदांची दांडी उडवण्याचा प्रयत्न करत असे. माझा उत्साह पाहून मला उत्तेजन मिळावे आणि त्यांनाही खेळायला मिळावे, म्हणून ते देखील मुद्दाम आऊट होत, तेव्हा माझी छाती आनंदाने फुगत असे आणि मी अधिक जोराने चेंडू फेकत असे. मात्र जेव्हा इतर सभासद येत तेव्हा नाइलाजाने त्यांना बॉल द्यावा लागे. तरीसुद्धा लांब उडालेला चेंडू धावत जाऊन अडवण्यात आणि तो

लगेच उचलून फेकण्यात मी समाधान मानत असे. आपणही यांच्याप्रमाणेच खेळावे, अशी इच्छा मनात येई. पुढच्या आयुष्यात क्रिकेट खेळाडू होण्याची खूणगाठ मी इथेच मनाशी बांधली. प्रॅक्टिस संपल्यावर चेंडू गोळा करू लागणे, दुसऱ्या दिवसासाठी ग्राऊंडवर पाणी मारणे इत्यादी कामांत मी ग्राऊंड्समनला आनंदाने मदत करत असे. हे सर्व होत असता, रात्रीचे ६ ते ८ वाजता माझे काका सर्व मुलांना एकत्र बसवून प्रार्थना शिकवत व अभ्यासाला बसवत.

(२) (i) **एका वाक्यात उत्तर लिहा.** **1**

लेखक कोणाची दांडी उडवण्याचा प्रयत्न करत असे ?

(ii) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** **1**

कोणी नाही असे पाहून ते मला ·········· फेकायला बोलवत.

(दगड, गोळा, चेंडू, भाला)

(३) **व्याकरण :**

(i) **अधोरेखित शब्दाची जात ओळखा.** **1**

आंधळा मागतो <u>एक</u> डोळा आणि देव देतो दोन!

(ii) **वचन बदला.** **1**

(i) चेंडू – [ ] (ii) डोळा – [ ]

(४) **स्वमत :** **2**

'आंधळा मागतो एक डोळा व देव देतो दोन!' असे लेखकाला का वाटले याबाबत तुमचे मत लिहा.

**प्र.१ आ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** **2**

(i)




(ii)



**सुश्रुत** : तुझे काही प्रकार असतात का ? कारण आज मराठीच्या मॅडम म्हणाल्या, ''आपण 'साहस कथा' शिकूया''.
**कथा** : अगदी बरोबर ! परीकथा, बोधकथा, विज्ञानकथा, ऐतिहासिक कथा हे माझेच अनेक उपप्रकार आहेत. शिवाय नाटक, मालिका, चित्रपट या सर्व ललितकलांचा पाया म्हणजे मी. मूळ कथा दर्जेदार असल्याशिवाय कोणतीही कलाकृती उत्तम होऊ शकत नाही. एवढंच नाही तर उत्तम निवेदन तंत्रामुळे मी खुलत जाते, रंगत जाते किंबहुना उत्तम निवेदनतंत्राचा वापर हे माझ्या यशाचं रहस्य.
**सुश्रुत** : तुला निर्माण करणाऱ्या लेखकांची नावं मला सांग ना-
**कथा** : य. गो. जोशी, वि. स. खांडेकर, विभावरी शिरूरकर, व्यंकटेश माडगूळकर, व. पु. काळे, शंकर पाटील, अण्णा भाऊ साठे, बाबुराव बागुल, द. मा. मिरासदार यांसारख्या अनेक नामवंत लेखकांनी आपल्या उत्तमोत्तम कथांनी मराठी वाचकांना तृप्त केलंय.
**सुश्रुत** : कित्ती सुंदर! आता ही ताई कोण बरं ?
**कादंबरी** : काय सुश्रुत, आवडली का कथा ? मी कादंबरी. कथेची थोरली बहीणच म्हणा हवं तर. कादंबरी म्हणजे खरं तर मोठी कथाच ; पण माझा आवाका कथेपेक्षा फार मोठा !
**सुश्रुत** : मोठ्ठा म्हणजे किती गं ?
**कादंबरी** : अरे, माझ्यात खूप खूप पात्रं असतात. त्यांचा परस्पर संबंध असतो. विविध घटना, प्रसंगातून माझे कथानक हळूहळू उलगडत जाते. वाचता वाचता माझ्यातील पात्रं तुम्हांला ओळखीची वाटू लागतात, आपल्यातीलच भासू लागतात. अनेक अनपेक्षित वळणं घेत घेत मी वाचकांची उत्कंठा वाढवते. आता या कथानकात पुढे काय होईल? याचा विचार करत वाचक माझ्यात गुंतून जातो व रममाण होतो.
**सुश्रुत** : खरंच, तुझा आवाका खूपच मोठा आहे.
**कादंबरी** : बरं का सुश्रुत, साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च मानाचा 'ज्ञानपीठ' पुरस्कार वि. स. खांडेकर यांच्या 'ययाति' या कादंबरीला मिळाला. तेव्हा मराठी माणसांचा ऊर अभिमानानं भरून आला. (इतक्यात कविता सुश्रुतच्या खांद्याला धरून विचारते.)
**कविता** : सुश्रुत, ओळखलंस मला ? अरे, मी आहे कविता. आपली तर फार पूर्वीपासून चांगलीच ओळख आहे. नाही का? तुमच्या पाठ्यपुस्तकांतल्या सगळ्या कविता तुम्ही तालासुरांत म्हणता.
**सुश्रुत** : हो ताई ! मला आठवतंय. 'ही आवडते मज मनापासुनी शाळा' आणि 'श्रावणमासी हर्ष मानसी' या माझ्या आवडत्या कविता.
**कविता** : छान हं. सुश्रुत, माझं रूप छोटंस, आटोपशीर. मोजक्या शब्दांत मोठ्ठा आशय व्यक्त करणं हे माझं वैशिष्ट्य. यमक, अनुप्रास अशा शब्दालंकारांनी माझं बाह्यरूप आणि उपमा, उत्प्रेक्षा, रूपकासारख्या अर्थालंकारांनी माझं अंतरंग सजवून कवी मला अधिक आशयगर्भ करतात.
**सुश्रुत** : मॅडम नेहमी सांगतात कवितेची शब्दरचना अर्थपूर्ण व चपखल असते. कल्पनांचा सुंदर आविष्कार कवितेत असतो, हे बरोबर ना?
**कविता** : अगदी बरोबर ! आणखी काय माहीत आहे सुश्रुत तुला ?
**सुश्रुत** : ताई, मला असं वाटतं संगीतकारांनी स्वरसाज चढवला, की तुझं गाण्यात रूपांतर होतं, कारण तुला मी पाठयपुस्तकात वाचतो आणि सीडीमध्ये, चित्रपटात ऐकतोसुद्धा.

**(२) सकारण लिहा.** **2**

(i) कवितांची व आपली फार पूर्वीपासून चांगलीच ओळख आहे.

(ii) मराठी माणसांचा ऊर अभिमानानं भरून आला.

(३) **व्याकरण :**

**पर्यायी शब्द लिहा.** **2**

**गूढ** → [ ]  **संतुष्ट** → [ ]  **परिचय** → [ ]  **अर्थ** → [ ]

(४) **स्वमत :** **2**

तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत लिहा.

**अपठित गद्य**

**प्र.१ इ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **कृती पूर्ण करा.** **2**

(i) **यांच्या पायावर एक कुटुंब निर्माण करणे मनुष्यत्त्वाचे ध्येय.** → [ ] [ ]

(ii) **सर्व मानवांना परमेश्वराने दिलेले स्वातंत्र्य** → [ ] [ ]

सगळी मनुष्यजात ही एक आहे आणि सगळ्या मनुष्यजातीचे स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यांच्या पायावर एक कुटुंब निर्माण करणे हेच मनुष्यत्वाचे ध्येय होय. परमेश्वराने सर्व मानवांना जन्मत:च धार्मिक व राजकीय स्वातंत्र्य दिले आहे. सर्वांना ऐहिक जीवनाचा, विश्वातील वस्तूंचा यथेच्छ उपभोग घेण्याचा सारखाच अधिकार आहे. शेतकी, कला-कौशल्य, मजुरी इत्यादी कामे मनुष्यास हीनपणा आणित नसून त्यांच्यायोगे मनुष्याची थोरवी सिद्ध होते. निसर्गशक्तीचा मनुष्याच्या गरजा भागविण्याकरता उपयोग करणे हा मनुष्याचा मूलभूत अधिकार व कर्तव्य होय. ईश्वराने निर्माण केलेल्या सृष्टीत प्रयत्न केल्यास सर्व मनुष्यांस त्याचा स्वर्ग बनवता येईल. या विश्वात जगण्याकरता आणि उपभोगण्याकरता वस्तू उत्पन्न करणे किंवा मिळवणे हे मनुष्याचे पहिले कर्तव्य आहे. आणि त्याकरता परस्परांना साहाय्य करणे हा मनुष्याचा श्रेष्ठ धर्म आहे. एवढेच नव्हे तर ही ईश्वराची पूजा आहे.

(२) **उत्तरे लिहा.** **2**

(i) मनुष्यास मिळालेला समान अधिकार - [ ]

(ii) मनुष्याची थोरवी सिद्ध करणारी कामे - [ ]

(३) **व्याकरण :**
**खालील तक्ता पूर्ण करा.** **2**

| शब्द | प्रत्यय | सामान्यरूप |
| --- | --- | --- |
| परमेश्वराने | ........... | ........... |
| मानवांना | ........... | ........... |

(४) **स्वमत :** **2**
आपल्याला मिळालेल्या हक्कांचा वापर आपण कसा करावा स्पष्ट करा.

## विभाग २ – पद्य

**प्र.२ अ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**
(१) **कसं ते पूर्ण करा.** **2**

| | | |
| --- | --- | --- |
| हसावं | - | |
| मुरावं | - | |
| जगावं | - | |
| चिंतन | - | |

झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत...
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत
झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिरांना कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं
नव्या नवरीसारखं
झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीरभर पालवी
अन झटकली जाते मरगळ

पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडाचंही जीवनाचं
एक संथ गाणे दडलेले असते
हसावं कसं सळसळत्या पानासारखं
मुळावं मुरावं कसं तर ? झाडासारखं घट्ट पाय रोवीत
जगावं कसं तर ? हिरवंगार झाडासारखं
रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं !

(२) (i) **खालील प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात लिहा.** 1
झाडाच्या मुळावर घाव घातल्यावर त्याची प्रतिक्रिया काय असते ?

(ii) 'पानझडीनंतर' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा. 1

(३) **पुढील ओळीचे अर्थसौंदर्य स्पष्ट करा.** 2
'पक्षी झाडांचे कुणीच नसतात तरीही झाडं त्यांचं असतं'

(४) 'झाडाचे मानवी जीवनातील महत्त्वाचे स्थानं', या विधानाचा तुम्हाला कळलेला अर्थ स्पष्ट करा. 2

**प्र.२ आ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** 2




या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार
नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार।।
फुलामुलांतून हसतो श्रावण
मातीचे हो मंगल तनमन
चैतन्याचे फिरे सुदर्शन
शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार।।
या हातांनी यंत्र डोलते
श्रमशक्तीचे मंत्र बोलते
उद्योगाचे चक्र चालते
आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार।।
हजार आम्ही एकी बळकट
सर्वांचे हो एकच मनगट
शक्तीचीही झडते नौबत

घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार।।

या विश्वाची विभव संपदा
जपू वाढवू आम्ही लाखदा
हस्त शुभंकर हवा एकदा
भविष्य उज्ज्वल या देशाचे करूया जयजयकार।।

**(२) खालील शब्दसमूहांतील संकल्पना स्पष्ट करा.** **2**

(i) हस्त शुभंकर – [ ]

(ii) आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार – [ ]

**(३) खालील काव्यपंक्तीमधून सूचित होणारा अर्थ लिहा.** **2**

शेतामधून पिकवू मोती, धन हे अपरंपार ।।

**(४) कवितेत व्यक्त झालेला एकात्मतेचा विचार स्पष्ट करा.** **2**

**प्र.२ इ. खालील ओळींचे रसग्रहण करा.** **4**

(१) जीव ओवाळावा तरी जीव किती हा लहान; तुझ्या शौर्यगाथेपुढे त्याची केवढीशी शान

## विभाग ३ – स्थूलवाचन

**प्र.३. खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** **6**

(१) आपलाच शब्द थोडेसे रूप बदलून इतर भाषांमध्येही वापरला जातो. कसा ते लिहा.
(उदा. दिवाळी)

| संस्कृत | बंगाली | हिंदी | पंजाबी | गुजराती | सिंधी |
|---|---|---|---|---|---|
| ........ | ........ | ........ | ........ | ........ | ........ |

(२) वाळवंटी प्रदेशातील झाडांना काटे असण्याची कोणकोणती कारणे असावीत, असे तुम्हांला वाटते ते लिहा.

(३) टिपा लिहा.

**सग्वारो कॅक्टस**

- सग्वारो कॅक्टसचे दिसणे
- सग्वारो कॅक्टसचे उपयोग

## विभाग ४ – भाषाभ्यास

**प्र.४ (अ) भाषाभ्यासावर आधारित कृती**

(i) **समास** 2

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | चौघडी | --------------- | --------------- |
| (ii) | नफातोटा | --------------- | --------------- |

(ii) **अलंकार** 2

खालील ओळीतील उपमेय, उपमान, साम्यवाचक शब्द व समान धर्म (गुण) असे वर्गीकरण करा.

त्याचे अक्षर मोत्यासारखे सुंदर आहे.

| उपमेय | उपमान | साम्यवाचक शब्द | समान धर्म |
|---|---|---|---|
| -------- | -------- | -------- | -------- |

(iii) **वाक्यरूपांतर** 2

**कंसातील सूचनेप्रमाणे वाक्य परिवर्तन करून लिहा.**

१. पत्र आल्यापासून तो त्याच आनंदात होता. (नकारार्थी करा.)

२. या खेळाने मला जास्त भुरळ पाडली. (उद्गारार्थी करा.)

(iv) **सामान्यरूप** 2

**दिलेल्या शब्दांचे मूळशब्द व सामान्यरूप असे वर्गीकरण करा.**

| क्र. | दिलेला शब्द | मूळशब्द | सामान्यरूप |
|---|---|---|---|
| (१) | प्रत्येकाने | -------- | -------- |
| (२) | नियमानुसार | -------- | -------- |

(v) **वाक्प्रचार** 2

**खालील वाक्प्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(भुरळ पाडणे, खूणगाठ बांधणे, नतमस्तक होणे)

१. माधुरीच्या नृत्याच्या अदांनी मला आकर्षित केले.

२. मी पोलीस अधिकारी होण्याचे मनाशी पक्के ठरवले.

**प्र.४ (ब) स्वाध्यायावर आधारित कृती.**

**(१) शब्दसंपत्ती** 1

(i) **समानार्थी शब्द लिहा.**

१. तारीफ - ............ २. वृत्ती - ............

(ii) **विरुद्धार्थी शब्द लिहा.** 1

१. विचार × ☐ २. आस्था × ☐

(iii) **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.** 1

दुष्काळामुळे बाधीत झालेले लोक - ☐

(iv) **एका शब्दाचे भिन्न अर्थ लिहा.** 1

☐ ← चरण → ☐

**(२) लेखननियमांनुसार लेखन**

(i) **अचूक शब्द ओळखून लिहा.** 1

१. वेक्तीमत्त्व / व्यक्तिमत्त्व / व्येक्तिमत्त्वा /व्यक्तीमत्व

२. सामुहीक / सामूहिक / समुहिक / सामूहीक

(ii) **खालील वाक्य लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.** 1

आतापरयंत किती झाडं तूम्ही लावली आहेत ?

**(३) विरामचिन्हे**

**खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.** 2

१. एकदम लोन्यागत पाय हाय काकांचा रेखामावशी स्वत:शीच पुटपुटल्या

२. बार्क हे भाभा अॅटॉमिक रिसर्च सेंटर म्हणजे भाभा अणुसंशोधन केंद्र या नावाने लघुरूप आहे

**(४) पारिभाषिक शब्द**

**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.** 1

१. Workshop - २. Index -

**(५) भाषिक खेळ**

**दोन नादानुकारी शब्द लिहा.** 1

जसे-घणघणली –

## विभाग ५ – उपयोजित लेखन

**प्र.५ अ. खालील कृती सोडवा.**

**(१) पत्रलेखन** **5**

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

> अ आ इ ई
>
> ***मराठी सुलेखन वर्ग***
>
> **विनय ॲकॅडमी तर्फे**
>
> कालावधी १ मे ते ३१ मे
>
> सुलेखन वर्गाचे आयोजन
>
> संपर्क :
>
> श्री. विनय गायकवाड
>
> २, सोमवार पेठ, कराड
>
> भ्रमणध्वनी - ८८४४००१७००
>
> माफक फी

**विद्यार्थी या नात्याने वर्गात प्रवेश देण्याची विनंती करणारे पत्र संबंधित व्यक्तीला लिहा.**

**(२) सारांश लेखन** **5**

**खालील उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

माणूस झाडावरून जमिनीवर उतरला आणि याच सुमारास तो दोन पायांवर चालू लागला. त्यामुळे त्याचे हात भक्ष्य शोधण्याकरता मोकळे राहू लागले. माणसाची दृष्टी चांगली होती, हाताची ठेवण वैशिष्ट्यपूर्ण होती आणि या सर्वांच्या जोडीला बुद्धीचे वरदान होते. परिणामत: माणसाने भाषा शोधली, हत्यारे निर्माण केली, अग्नीचा शोध लावला, चाकाचा शोध लावला, लिपीची निर्मिती केली. माणसाचे पृथ्वीवरील अस्तित्व बुद्धीच्या सामर्थ्यामुळे टिकले. कदाचित वेगळ्या परिस्थितीत माणसाऐवजी इतरही वेगळ्या रीतीने उत्क्रांत झाले असते, बुद्धिमान झाले असते, तर त्यांचे अधिराज्य येथे निर्माण झाले असते. कदाचित देवमासे वा बबून यांनी पृथ्वी व्यापली असती. उत्क्रांतीचे रहस्य अजूनही पूर्णपणे समजलेले नाही. आपल्याला फक्त येथील उत्क्रांतीची माहिती आहे.

**प्र.५ आ. खालील कृती सोडवा.**

**(१) कथा लेखन** **6**

**खालील शब्द गुंफून एक छानशी कथा तयार करा. कथेला शीर्षक द्या.**

बैल – सिंह – युक्ती – भांडण.

**(२) जाहिरात लेखन** **6**

**खालील जाहिरात वाचून त्याखाली दिलेल्या कृती लिहा.**

१) चौकट पूर्ण करा. **2**

(i) दुकानाचे नाव - [ ]

(ii) जाहिरातीतील टीप - [ ]



**प्रणव स्टेशनरी मार्ट**

(शालोपयोगी साहित्याचे विश्वसनीय नाव)

वह्या-पुस्तकांचे होलसेल व्यापारी
१लीपासून १२वीपर्यंत मराठी व
इंग्रजी माध्यमातील शालेय पाठ्यपुस्तके उपलब्ध
योग्य किंमत

टीप : आमची कोठेही शाखा नाही.

पत्ता : शॉप नं. ३, गंगा प्लाझा, एम.जी. रोड, मुलुंड (प.), मुंबई - ४०० ०८०.

२) दुकानाची वैशिष्ट्ये: **2**

(i) ................. (ii) .................

(iii) ................. (iv) .................

३) जाहिरातीतील चित्रे – ☐ – ☐ **1**

४) स्टेशनरीचा पत्ता – .................................... **1**

**प्र.५ इ. लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (१०० ते १२० शब्द)** **8**

**(१) मी अनुभवलेला व पाहिलेला 'अब्दुलचा सत्कार समारंभ'**




**वरील सत्कार समारंभ प्रसंगी तुम्ही उपस्थित होता. त्या भावपूर्ण प्रसंगाचे लेखन करा.**

(२) पिंजऱ्यातील पोपटाचे आत्मवृत्त




**Best Of Luck**